# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5 वी), फेब्रुवारी 2023

**बैठक क्र.** | | | | | | | | | | | |

**संच A**

**0 1 0 1**

**पेपर क्र. - I**

**वेळ : 11:00 ते 12:30**

## माध्यम : मराठी

## प्रथम भाषा व गणित

**एकूण गुण : 150**

**पृष्ठ : 32**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमगत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा. उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील. ✓ ② ⊙ ④

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

## विभाग - I

**मराठी**

**प्रश्न 01 ते 03 साठी सूचना:–**

खालील संवाद वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

''आई, मला प्लीज हॅण्डवॉश देना!''
''प्रमोद, मी काय करतेय, आजीकडून घे.''
''का रे? शाळेत न्यायचाय का?''
''हो ना आजी, आज शाळेत हात धुवायचे आहेत.''
''रोजच धुतोस ना रे? आज वेगळे काय?''
''अहो बाबा, आज 'जागतिक हात धुवा दिन' साजरा करायचा आहे शाळेत.''
''काय तरी खूळ बाई! 'हात धुणे' यात साजरा करण्यासारखं काय आहे?''
''अगं आजी, स्वच्छ हातांचे महत्त्व पटवून देण्यासाठीच हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवायचा आहे.''
''हो का? बरं बरं!''
''अरे, संदेश वरून आठवलं, आपला संदेश येणार नाही आज.''
''बाबा, मग आम्हांला शाळेत कोण सोडणार?''
''मी येतो सोनाली, तुम्हांला सोडायला. फक्त थोडा चहा घेतो.''
''अरे वा! आई, काकासाठी चहा कर ना पटकन!''
''प्रमोद, ही घे तुमच्या दोघांसाठी पुस्तके. ही पण घेऊन जायची आहेत ना?''
''हो, हो! थँक्यू बाबा.''

**01.** शाळेमध्ये कोणता कार्यक्रम त्या दिवशी होणार नसावा?

(1) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती (2) जागतिक हात धुवा दिन
(3) वाचन प्रेरणा दिन (4) लोकमान्य टिळक पुण्यतिथी

**02.** वरील संवादात प्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या व्यक्ती किती?

(1) सात (2) सहा
(3) पाच (4) आठ

**कच्च्या कामासाठी फक्त**

**03.** वरील संवादात उल्लेखलेला संदेश कोण असावा?

(1) ड्रायव्हर (2) प्रमोदचा काका

(3) निश्चितपणे सांगता येणार नाही (4) सोनालीचा मामा

**04.** खालील अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण म्हणीतील सहावे अक्षर कोणते?

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | म | च्या | चा | णा | चे | ना | ना |
| जी | ले | ले | को | ते | दे | थे | वा |

(1) चे (2) ले

(3) णा (4) च्या

**05.** दारापुढे रेखाटलेली रांगोळी अशी सुबक असायची, की पाहणारे तोंडात बोट घालत. अधोरेखित शब्दासाठी योग्य समानार्थी शब्द पर्यायांतून निवडा.

(1) रंगीत (2) स्वच्छ

(3) फैनाबाज (4) ठिपक्यांची

**06.** पुढीलपैकी भविष्यकाळी असलेले वाक्य कोणते?

(1) तुझी कोणतीही अडचण असली तरी ती आपण सोडवू.

(2) सरपंच अचानक आमच्या घरी आले.

(3) गावातील सारेच लोक श्रमदान करत असत.

(4) कायद्यानुसार मुलीला शिकवावेच लागेल.

**07.** खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ पर्यायांतून निवडा.

'जन्मतःच वाचादोष असलेल्या बाळाचा यामध्ये काय दोष?'

(1) व्यंग (2) चूक

(3) संकट (4) अनिष्ट गुण

**कच्च्या कामासाठी फक्त**

**08.** खाली दिलेल्या ओळींमधील विशेषण कोणते?

थंडी आली, पेटवा आगटी, शेका हात गार!

(1) थंडी (2) गार

(3) आगटी (4) शेका

**09.** पुढीलपैकी कोणता दिवस आपण 'शिक्षण दिन' म्हणून साजरा करतो?

(1) 5 सप्टेंबर (2) 14 नोव्हेंबर

(3) 14 सप्टेंबर (4) 11 नोव्हेंबर

**प्रश्न 10 ते 12 साठी सूचना:–**

खाली दिलेली बातमी वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

**● विद्यार्थ्यांनी फेडले समाजाचे ऋण ●**

पुणे, प्रतिनिधी

ता. 20 : पुण्यातील 'जनशाळा विद्यामंदिर' या शाळेत दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरले होते. दि. 15 ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध बालकलाकार 'सानवी केंद्रे' हिच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांनी सुगंधी उटणे, रंगीत आकाशकंदील, सुगंधी लिक्विड सोप, सुगंधी मेणपणत्या तयार केल्या होत्या. आकर्षक रंगकाम केलेली लक्ष्मीची पावले आणि तुळशीवृंदावन याचे लोकांनी विशेष कौतुक केले. दि. 19 ऑक्टोबरला 'स्नेहघर' अनाथालयाच्या अध्यक्षा 'अनघा फेणे' यांच्या हस्ते समारोप करताना जमलेला सर्व निधी विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे सुपूर्त केला.

**10.** विद्यार्थ्यांनी समाजाचे ऋण कसे फेडले?

(1) अनाथालयास मदत करून (2) लोकांसाठी पणत्या, उटणे बनवून

(3) वस्तूंचे प्रदर्शन भरवून (4) शाळेत प्रवेश घेऊन

**11.** प्रदर्शनाचा कालावधी किती दिवस होता?

(1) चार (2) सहा

(3) दोन (4) पाच

| कच्च्या कामासाठी फक्त |
|---|
| |

**12.** बातमीचा विषय कोणत्या घटकावर आधारित आहे?

(1) सांस्कृतिक (2) सामाजिक

(3) मनोरंजन (4) राजकीय

**13.** खाली दिलेल्या वाक्यातील उद्देश्य भाग ओळखा.

'अनेक संस्कृत शब्द आपण मराठी समजूनच वापरतो.'

(1) अनेक संस्कृत शब्द (2) आपण

(3) अनेक (4) वापरतो

**14.** खाली दिलेल्या पर्यायांतून लिंगप्रकारानुसार वेगळा शब्द ओळखा.

(1) डाळिंबे (2) बोरे

(3) लिंबे (4) आंबे

**15.** खाली दिलेल्या वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह येईल, ते पर्यायांतून निवडा.

खराब कागदापासून पुन्हा नवा कागद, शोभेच्या वस्तू–मजाच आहे की

(1) पूर्णविराम (2) प्रश्नचिन्ह

(3) उद्गारचिन्ह (4) अर्धविराम

**16.** खाली दिलेल्या शब्दसमूहाबद्दल अचूक शब्द पर्यायांतून निवडा.

'एखादी गोष्ट जाणून घेण्याची इच्छा'

(1) कोलाहल (2) कुतूहल

(3) प्रतीक्षा (4) दक्षता

**17.** पुढीलपैकी पाठाचे नाव आणि लेखक यांची योग्य जोडी असलेला पर्याय निवडा.

(1) मजेशीर होड्या – निर्मला मठकरी (2) आनंदाचं झाड – सुशीला शिंदे

(3) शेरास सव्वाशेर – पॉल रूमाव (4) ढोल – शंकर पाटील

**कच्च्या कामासाठी फक्त**

**18.** खालील वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी योग्य वाक्प्रचाराचा पर्याय निवडा.
'खेळताना मार लागला तरीही मुले ___________.'

(1) पोबारा करणे (2) पसार होणे
(3) हार मानणे (4) पर्वा न करणे

**19.** 'काकू आल्या' असे म्हणताच काकांना घाम फुटायचा, कारण त्यांची बायको म्हणजे जणू ___________.

(1) लंकेची पार्वती (2) त्राटिका
(3) गोगलगाय (4) भानामती

**प्रश्न 20 ते 22 साठी सूचना:–**

कविता वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

निळ्या सागरी उसळल्या लाटा,
उसळणाऱ्या फेसाळ लाटा
अक्राळविक्राळ झाल्या कशाने?
शांत, सरळ अन् खेळकर तर होत्या।।

उधाण आले समुद्रास या
आनंदाने की रौद्राने
हेलकावे खाऊ लागल्या होड्या
साद घातली माझ्या बांधवाने।।

अथांग सागरी मदत कुणाची?
साद घालिती लेकरे सिंधूची
अंधाराचे पांघरूण चढता
जीव घाबरा होऊ लागला।।

उधाण आले; शांतही झाले
विध्वंसाचा मागमूस न उरे
निसर्गाच्या या खेळापुढे
मानवाचे सामर्थ्य हरे।।

**कच्च्या कामासाठी फक्त**

**20.** कवितेत पुढीलपैकी कशाचे वर्णन केले आहे?

(1) लाटांचे (2) अंधाऱ्या रात्रीचे

(3) खवळलेल्या समुद्राचे (4) नदीच्या पुराचे

**21.** पुढीलपैकी कोणत्या शब्दाचा समानार्थी शब्द कवितेत आला नाही?

(1) तम (2) हर्ष

(3) जलधि (4) पाणी

**22.** कवितेतील वर्णनानुसार पुढीलपैकी चुकीचे विधान कोणते?

(1) निळ्या सागरात लाट्या उसळल्या होत्या.

(2) निसर्गापुढे माणसाची ताकद कमी पडते.

(3) उसळलेल्या लाटा शांत, सरळ अन् खेळकर होत्या.

(4) होड्या हेलकावे खाऊ लागल्या.

**23.** गणितातील आकडेमोड करण्यासाठी श्लोकने '<u>संगणकाची आज्ञावली</u>' तयार केली. अधोरेखित शब्दांसाठी योग्य इंग्रजी शब्द निवडा.

(1) कॅलक्युलेटर (2) की बोर्ड

(3) सॉफ्टवेअर (4) प्रोग्रॅम

**24.** 'बाळासाहेबांनी केलेल्या आदरातिथ्याबद्दल, आलेल्या ____________ त्यांचे कौतुक केले.' रिकाम्या जागी योग्य जोडशब्द पर्यायांतून निवडा.

(1) नातेवाईकांनी (2) पैपाहुण्यांनी

(3) वऱ्हाडी मंडळींनी (4) कलाकारांनी

**25.** जसे – गायीचे वासरू, तसे म्हशीचे ____________.

(1) करडू (2) लेकरू


(3) कोकरू (4) पारडू

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

## SECTION - II

## MATHEMATICS

**26.** In the given figure how many vertices are there?



(1) 8 (2) 9

(3) 10 (4) 7

**27.** 65 kg 500 gm of sweets were brought by an Institute for school students. If 60 kg 200 gm of sweets were distributed among the students how much sweets are left?

(1) 5 kg 200 gm (2) 5 kg 100 gm

(3) 5 kg 400 gm (4) 5 kg 300 gm

**28.** In a circle, radius is 2 cm and length of a chord is 3 cm. What is the length of longest chord of a circle?

(1) 5 cm (2) 6 cm


(3) 2 cm (4) 4 cm

**SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग - II

### गणित

**26.** दिलेल्या आकृतीला किती शिरोबिंदू आहेत?



(1) 8 (2) 9
(3) 10 (4) 7

**27.** एका संस्थेने शाळेतील मुलांना देण्यासाठी 65 किग्रॅ 500 ग्रॅम मिठाई आणली. 60 किग्रॅ 200 ग्रॅम मिठाईचे वाटप करण्यात आले. तर किती मिठाई शिल्लक राहिली?

(1) 5 किग्रॅ 200 ग्रॅम (2) 5 किग्रॅ 100 ग्रॅम
(3) 5 किग्रॅ 400 ग्रॅम (4) 5 किग्रॅ 300 ग्रॅम

**28.** वर्तुळाची त्रिज्या 2 सेमी आहे. एक जीवा 3 सेमी आहे. तर वर्तुळाच्या सर्वात मोठ्या जीवेची लांबी किती सेमी आहे?

(1) 5 सेमी (2) 6 सेमी
(3) 2 सेमी (4) 4 सेमी

**कच्च्या कामासाठी फक्त**

**29.** Which of the following mathematical expression has maximum value?

(1) $10 - 3 \times 3$

(2) $10 \times 3 + 3$

(3) $10 + (3 + 3)$

(4) $3 \times 3 + 10$

**30.** A rectangular room of length 10m and breadth 8m is tiled. What is the cost of tilling at the rate of ₹ 30 per sqm?

(1) ₹ 2400

(2) ₹ 2200

(3) ₹ 2000

(4) ₹ 80

**31.** A decimal fraction 0.17 cannot be written in which of the following way.

(1) $\frac{17}{100}$

(2) $\frac{10}{100} + \frac{7}{100}$

(3) $\frac{10+7}{100}$

(4) $10 + \frac{7}{100}$

**32.** Select the correct option

(1) Selling price – Cost price = Profit

(2) Cost price + Selling price = Loss

(3) Selling price – Loss = Cost price

(4) Cost price – Profit = Selling price

**33.** 3, 0, 5, 7, 9, 1 use each digit only once to obtain largest 6 digit odd number.

(1) 975310

(2) 105793

(3) 975301

(4) 973501

**SPACE FOR ROUGH WORK**

**29.** पुढीलपैकी कोणत्या पदावलीची किंमत सर्वात जास्त आहे?

(1) $10 - 3 \times 3$ (2) $10 \times 3 + 3$

(3) $10 + (3 + 3)$ (4) $3 \times 3 + 10$

**30.** एका आयताकृती वर्गखोलीची लांबी 10 मी व रुंदी 8 मी आहे. त्या वर्गखोलीत फरशी बसवण्यासाठी एका चौ. मीटरला 30 रुपये याप्रमाणे किती मजूरी द्यावी लागेल?

(1) 2400 रुपये (2) 2200 रुपये

(3) 2000 रुपये (4) 80 रुपये

**31.** 0.17 हा दशांश अपूर्णांक कशाप्रकारे लिहिता येणार नाही.

(1) $\frac{17}{100}$ (2) $\frac{10}{100} + \frac{7}{100}$

(3) $\frac{10+7}{100}$ (4) $10 + \frac{7}{100}$

**32.** दिलेल्या पर्यायांपैकी अचूक विधान कोणते?

(1) विक्री किंमत − खरेदी किंमत = नफा

(2) खरेदी किंमत + विक्री किंमत = तोटा

(3) विक्री किंमत − तोटा = खरेदी किंमत

(4) खरेदी किंमत − नफा = विक्री किंमत

**33.** 3, 0, 5, 7, 9, 1 यांपैकी प्रत्येक अंक एकदाच वापरून सहा अंकी मोठ्यात मोठी विषम संख्या तयार करा.

(1) 975310 (2) 105793


(3) 975301 (4) 973501

**कच्च्या कामासाठी फक्त**

**34.** 6 hrs 40 min + 2 hrs 35 min = ?

(1) 8 hrs 40 min
(2) 8 hrs 15 min
(3) 5 hrs 5 min
(4) 9 hrs 15 min

**35.** What is the percentage of shaded portion in the given figure?



(1) 50%
(2) 75%
(3) 25%
(4) 85%

**36.** Chandu typed at the speed of N words per hour for 5 hours and Ali typed at the speed of M words per hour for 6 hours. Total how many words did both of them type?

(1) 5N × 6M
(2) 6M – 5N
(3) 5M × 6N
(4) 5N + 6M

**37.** In a milk collection centre there are 300 bags of 1 litre each and 600 bags of 500 ml each. If 560 litres of milk is distributed then how much milk is left?


(1) 40 litre
(2) 50 litre
(3) 500 litre
(4) 30 litre

**SPACE FOR ROUGH WORK**

**34.** 6 तास 40 मिनिटे + 2 तास 35 मिनिटे = किती?

(1) 8 तास 40 मिनिटे
(2) 8 तास 15 मिनिटे
(3) 5 तास 5 मिनिटे
(4) 9 तास 15 मिनिटे

**35.** दिलेल्या आकृतीतील रेखांकित भागाची शेकडेवारी काढा.



(1) 50%
(2) 75%
(3) 25%
(4) 85%

**36.** चंदूने एका तासाला 'क्ष' अक्षरे याप्रमाणे 5 तास व अलीने एका तासाला 'म' अक्षरे याप्रमाणे 6 तास टंकलेखन केले. दोघांनी मिळून किती अक्षरांचे टंकलेखन केले?

(1) 5क्ष × 6म
(2) 6म – 5क्ष
(3) 5म × 6क्ष
(4) 5क्ष + 6म

**37.** एका दूधकेंद्रात 1 लीटरच्या 300 पिशव्या व 500 मिलिलीटरच्या 600 पिशव्या होत्या. त्यादिवशी 560 लीटर दुधाचे वाटप झाले. तर एकूण किती लीटर दूध शिल्लक राहिले?

(1) 40 लीटर
(2) 50 लीटर
(3) 500 लीटर
(4) 30 लीटर

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

**38.** Javed purchased 10 boxes of Mangoes at the rate of ₹ 3000 each. After some days Mangoes got spoiled so he sold them at ₹ 1200 per box. What is the percentage of loss he got?

(1) 40% (2) 60%

(3) 50% (4) 70%

**39.** Arrange the following in descending order. Find the difference between the second last and fourth last number. Which digit will occur at the tens place in this difference?

40273, 41237, 41260, 42106, 41238

(1) 4 (2) 3

(3) 2 (4) 9

**40.** 2 gross papers out of 2 rim of papers is used for printing, how many dozen papers are left?

(1) 672 (2) 56

(3) 66 (4) 288

**41.** Select the correct statement.

(1) Smallest divisor of 15 is 3.

(2) Only three divisors of 18 are even numbers.

(3) Any prime number has more than 2 divisors.

(4) Number of divisors is unlimited.

**SPACE FOR ROUGH WORK**

**38.** जावेदने 3000 रुपयांस एक याप्रमाणे आंब्याच्या 10 पेट्या खरेदी केल्या. काही दिवसांनी त्यातील काही आंबे नासल्यामुळे 1200 रुपयांस एक याप्रमाणे सर्व पेट्या विकल्या. तर या व्यवहारात त्याला किती टक्के तोटा झाला?

(1) 40% (2) 60%

(3) 50% (4) 70%

**39.** पुढील संख्या उतरत्या क्रमाने मांडा. शेवटून येणाऱ्या दुसऱ्या व चौथ्या संख्येमधील फरक काढल्यास दशकस्थानी कोणता अंक येईल?

40273, 41237, 41260, 42106, 41238

(1) 4 (2) 3

(3) 2 (4) 9

**40.** दोन रीम कागदांपैकी दोन ग्रोस कागद मुद्रणासाठी वापरले तर किती डझन कागद शिल्लक राहतील?

(1) 672 (2) 56

(3) 66 (4) 288

**41.** पुढीलपैकी कोणते विधान अचूक आहे.

(1) 15 चा सर्वात लहान विभाजक तीन आहे.

(2) 18 च्या सर्व विभाजकांपैकी फक्त तीन विभाजक समसंख्या आहेत.

(3) कोणत्याही मूळसंख्येला दोन पेक्षा जास्त विभाजक असतात.

(4) विभाजकांची संख्या मर्यादित नसते.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**42.** Arrange the multiples of 41 in ascending order. Which is the fourth even number in this set?

(1) 328 (2) 164

(3) 410 (4) 246

**43.** What is the perimetre of the given figure, when length of each square is 1.5 cm?



(1) 15 cm (2) 9 cm

(3) 39 cm (4) 36 cm

**44.** How many one digit and two digit square numbers contain 1, 6 and 9 at any place?

(1) 6 (2) 9

(3) 7 (4) 8

**45.** What is the simple interest on ₹ 3000 at the rate of 10 p.c.p.a for 3 years?

(1) ₹ 300 (2) ₹ 600

(3) ₹ 800 (4) ₹ 900

**SPACE FOR ROUGH WORK**

**42.** 41 ने विभाज्य असलेल्या समसंख्या चढत्या क्रमाने लावल्यास चौथ्या स्थानावर येणारी सम संख्या कोणती असेल?

(1) 328 (2) 164

(3) 410 (4) 246

**43.** दिलेल्या आकृतीतील प्रत्येक चौरसाची बाजू 1.5 सेमी असल्यास त्या आकृतीची परिमिती किती?



(1) 15 सेमी (2) 9 सेमी

(3) 39 सेमी (4) 36 सेमी

**44.** 1, 6 व 9 हे अंक कोणत्याही स्थानी असलेल्या एक अंकी व दोन अंकी एकूण वर्गसंख्या किती?

(1) 6 (2) 9

(3) 7 (4) 8


**45.** द. सा. द. शे. 10 दराने 3000 रुपये मुद्दलावर 3 वर्षांचे सरळव्याज किती?


(1) 300 रुपये (2) 600 रुपये


(3) 800 रुपये (4) 900 रुपये


**कच्च्या कामासाठी फक्त**

**46.** Which of the following indicates different fraction formed by shaded portion?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

**47.** If an article of ₹ 1000 is sold at 30% profit then how many rupees profit is gained in the transaction?


(1) ₹ 1030
(2) ₹ 150
(3) ₹ 300
(4) ₹ 1300


**48.** Lokesh and Roshan are working in a same company. Roshan received salary of rupees Fifteen and half thousand for 1 month and Lokesh received salary of rupees quarter to Eighteen thousand for same month. Salary of Lokesh is more by how much than Roshan's salary?


(1) Quarter and two thousand rupees.
(2) Two thousand and fifty rupees.
(3) Twenty two hundred rupees.
(4) Twenty three and half hundred rupees.


**SPACE FOR ROUGH WORK**

**46.** खालीलपैकी कोणत्या आकृतीतील रेखांकित भाग वेगळा अपूर्णांक दर्शवतो?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

**47.** 1000 रुपयांची वस्तू 30% नफा घेऊन विकली तर त्याला किती रुपये नफा झाला?

(1) 1030 रुपये (2) 150 रुपये

(3) 300 रुपये (4) 1300 रुपये

**48.** लोकेश व रोशन एका कंपनीत काम करीत होते. रोशनला एका महिन्याचा पगार साडेपंधरा हजार व लोकेशला पावणेअठरा हजार रुपये मिळाला. तर त्या महिन्यात लोकेशला रोशनपेक्षा किती रुपये पगार जास्त मिळाला?

(1) सव्वादोन हजार रुपये

(2) दोन हजार पन्नास रुपये

(3) बावीसशे रुपये

(4) साडेतेवीसशे रुपये

कच्च्या कामासाठी फक्त

**49.** Height of two pillars is 117 cm and 105 cm respectively. What is the height of the pillar formed by joining these two pillars?

(1) 2.22 mm (2) 222 m

(3) 2.22 cm (4) 2.22 m

**Note for Question 50 and 51.**

Answer the following questions on the basis of pictographical information given below. Pictograph indicates the number of students learning to play musical instruments.

| **Instrument** | **Number of students** |
|---|---|
| Tabla | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| Harmonium | ☺ ☺ ☺ |
| Flute | ☺ ☺ |
| Guitar | ☺ ☺ ☺ ☺ ☺ |

Scale : 1 picture = 10 students

**50.** Total how many students are learning to play musical instrument?

(1) 150 (2) 160

(3) 140 (4) 130

**51.** Which instrument is learnt by least number of students?

(1) Flute (2) Guitar

(3) Tabla (4) Harmonium

**SPACE FOR ROUGH WORK**

**49.** दोन खांबांची उंची अनुक्रमे 117 सेमी व 105 सेमी आहे. जर दोन खांब एकमेकांना जोडून एक खांब तयार केला. तर त्या खांबाची एकूण उंची किती?

(1) 2.22 मिमी (2) 222 मी

(3) 2.22 सेमी (4) 2.22 मी

**प्रश्न 50 व 51 साठी सूचना :**

खालील चित्ररूप माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.

वाद्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिलेली आहे.

| **वाद्य** | **शिकणारे विद्यार्थी संख्या** |
|---|---|
| तबला | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| हार्मोनियम | ☺ ☺ ☺ |
| बासरी | ☺ ☺ |
| गिटार | ☺ ☺ ☺ ☺ ☺ |

प्रमाण – 1 चित्र = 10 विद्यार्थी

**50.** एकूण किती विद्यार्थी वाद्य शिकत आहेत?

(1) 150 (2) 160

(3) 140 (4) 130

**51.** कोणते वाद्य वाजवणारे विद्यार्थी कमी आहेत?

(1) बासरी (2) गिटार

(3) तबला (4) हार्मोनियम

**कच्च्या कामासाठी फक्त**

**52.** Nikhil purchased three chocobars from a shop. He paid ₹ 50 to the shopkeeper and got ₹ 5 back from him. What is the cost of each chocobar?

(1) ₹ 20 (2) ₹ 10

(3) ₹ 12 (4) ₹ 15

**53.** Jay purchased an old bike at ₹ 17000 and after 2 months he sold it at ₹ 15000. How much is the loss in this transaction?

(1) ₹ 2000 (2) ₹ 4000

(3) ₹ 3200 (4) ₹ 5000

**54.** From the given set how many numbers are not completely divisible by 2?

162, 131, 890, 772, 245

(1) Three (2) Four

(3) Two (4) One

**55.** Which number should be subtracted from quarter to twenty six thousand to obtain 4 digit smallest even number?

(1) 25750 (2) 24750

(3) 27450 (4) 26750

**56.** If in the year 2010 Republic Day occured on Tuesday then in the same year Teacher's Day occured on which day?

(1) Sunday (2) Saturday

(3) Monday (4) Friday

**SPACE FOR ROUGH WORK**

**52.** निखिलने तीन चोकोबार विकत घेतले. दुकानदाराला 50 रुपयांची नोट दिल्यावर त्याला दुकानदाराने पाच रुपये परत दिले. तर एका चोकोबारची किंमत किती होती?

(1) 20 रुपये (2) 10 रुपये

(3) 12 रुपये (4) 15 रुपये

**53.** जयने जुनी मोटारसायकल 17000 रुपयांस विकत घेऊन दोन महिन्यांनी 15000 रुपयांस विकली तर या व्यवहारात त्याला किती रुपये तोटा झाला?

(1) 2000 रुपये (2) 4000 रुपये

(3) 3200 रुपये (4) 5000 रुपये

**54.** 162, 131, 890, 772, 245 या संख्यांमधील किती संख्यांना 2 ने निःशेष भाग जात नाही?

(1) तीन (2) चार

(3) दोन (4) एक

**55.** 'पावणे सव्वीस हजार' या संख्येतून कोणती संख्या वजा केल्यास सर्वांत लहानात लहान चार अंकी समसंख्या मिळेल?

(1) 25750 (2) 24750

(3) 27450 (4) 26750

**56.** सन 2010 ला प्रजासत्ताक दिन मंगळवारी असल्यास त्याच वर्षी शिक्षक दिन कोणत्या वारी असेल?

(1) रविवार (2) शनिवार

(3) सोमवार (4) शुक्रवार

**कच्च्या कामासाठी फक्त**

**57.** Sanjeev deposited certain amount at the rate 5 p.c.p.a. for 3 years in a bank. He received simple interest of ₹ 1500 after 3 years. How much amount did he deposit in the bank?

(1) ₹ 11500 (2) ₹ 10000

(3) ₹ 4500 (4) ₹ 5000

**58.** Which of the following numbers do not occur at unit place in the prime numbers from 10 to 100?

(1) 1, 3, 7 (2) 9, 7, 3

(3) 5, 2, 4 (4) 1, 3, 9

**59.** Each angle of a rectangle is _____.

(1) Acute angle (2) Right angle

(3) Obtuse angle (4) Linear angle

**60.** Quarter to nine litre means how much millilitre?

(1) 8750 ml (2) 9750 ml

(3) 8250 ml (4) 8550 ml

**61.** Select the correct option to indicate the number 'Seven lakhs seven thousand seven hundred and seven' in figures.

(1) 770707 (2) 77777

(3) 707707 (4) 707070

**SPACE FOR ROUGH WORK**

57. संजीवने काही रक्कम द.सा.द.शे. 5 दराने 3 वर्षे बँकेत ठेवले. तीन वर्षानंतर त्याला 1500 रुपये सरळव्याज मिळाले. तर त्याने किती रक्कम बँकेत ठेवली होती?

(1) 11500 रुपये (2) 10000 रुपये

(3) 4500 रुपये (4) 5000 रुपये

58. 10 ते 100 या संख्यांमध्ये येणाऱ्या मूळ संख्यांच्या एककस्थानी पुढीलपैकी कोणते अंक नसतील?

(1) 1, 3, 7 (2) 9, 7, 3

(3) 5, 2, 4 (4) 1, 3, 9

59. आयताचा प्रत्येक कोन _____ असतो.

(1) लघुकोन (2) काटकोन

(3) विशालकोन (4) प्रविशालकोन

60. पावणे नऊ लीटर म्हणजे किती मिलिलीटर?

(1) 8750 मिली (2) 9750 मिली

(3) 8250 मिली (4) 8550 मिली

61. 'सात लक्ष सात हजार सातशे सात' ही संख्या अंकात कशी लिहितात?

(1) 770707 (2) 77777

(3) 707707 (4) 707070

**कच्च्या कामासाठी फक्त**

**62.** Identify the pattern and select the correct number to fill the blank box.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 7 | 10 | | 22 | 33 | 46 |

(1) 5 (2) 17

(3) 10 (4) 15

**63.** Select the correct option which indicates the ascending order of fractions.

(1) $\frac{5}{6}, \frac{4}{6}, \frac{1}{6}, \frac{11}{6}, \frac{17}{6}$ (2) $\frac{1}{6}, \frac{5}{6}, \frac{6}{6}, \frac{11}{6}, \frac{17}{6}$

(3) $\frac{5}{6}, \frac{1}{6}, \frac{6}{6}, \frac{17}{6}, \frac{11}{6}$ (4) $\frac{1}{6}, \frac{5}{6}, \frac{6}{6}, \frac{17}{6}, \frac{11}{6}$

**64.** $225 \times 72 = \boxed{\phantom{0000}}$ select the correct option.

(1) 16200 (2) 2250

(3) 1650 (4) 22500

**65.** When two cubes are joined to form a cuboid then the number of edges are more than number of surfaces by how much?

(1) More by 2 (2) More by 3

(3) More by 8 (4) More by 6

**66.** Select the correct option to replace the box. $\frac{4}{7} + \frac{\boxed{\phantom{0}}}{8} = \frac{53}{56}$

(1) 4 (2) 2

(3) 3 (4) 5

**SPACE FOR ROUGH WORK**

**62.** दिलेला आकृतिबंध लक्षात घेऊन रिकाम्या चौकटीत येणारी संख्या लिहा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 7 | 10 | | 22 | 33 | 46 |

(1) 5 (2) 17

(3) 10 (4) 15

**63.** खालील पर्यायातील अपूर्णांकांची चढत्या क्रमाने मांडणी केलेला अचूक पर्याय कोणता?

(1) $\frac{5}{6}, \frac{4}{6}, \frac{1}{6}, \frac{11}{6}, \frac{17}{6}$ (2) $\frac{1}{6}, \frac{5}{6}, \frac{6}{6}, \frac{11}{6}, \frac{17}{6}$

(3) $\frac{5}{6}, \frac{1}{6}, \frac{6}{6}, \frac{17}{6}, \frac{11}{6}$ (4) $\frac{1}{6}, \frac{5}{6}, \frac{6}{6}, \frac{17}{6}, \frac{11}{6}$

**64.** $225 \times 72 = \boxed{\phantom{000}}$ चौकटीत योग्य पर्याय निवडा.

(1) 16200 (2) 2250

(3) 1650 (4) 22500

**65.** दोन घनाकृती ठोकळे एकमेकांस जोडले असता तयार होणाऱ्या त्रिमितीय आकृतीच्या कडांची संख्या पृष्ठांच्या संख्येपेक्षा कितीने जास्त असेल?

(1) 2 ने जास्त (2) 3 ने जास्त

(3) 8 ने जास्त (4) 6 ने जास्त

**66.** $\frac{4}{7} + \frac{\boxed{\phantom{0}}}{8} = \frac{53}{56}$ चौकटीमध्ये येणारी संख्या पर्यायातून निवडा.

(1) 4 (2) 2

(3) 3 (4) 5

**कच्च्या कामासाठी फक्त**

**67.** 30% of 60 = ?

(1) 9 (2) 90

(3) 30 (4) 18

**68.** Last year 427523 students of std. $5^{th}$ and 238249 of std. $8^{th}$ appeared for scholarship examination. Total how many students appeared for the examination.

(1) 662757 (2) 665772

(3) 662752 (4) 667527

**69.** Solve

$$\left(5+\frac{2}{10}+\frac{4}{100}+\frac{5}{1000}\right) - \left(2+\frac{1}{10}+\frac{3}{100}+\frac{2}{1000}\right) = \square$$

(1) 3.003 (2) 3.005

(3) 3.113 (4) 3.004

**70.** Riya purchased two and quarter metre of white cloth and two and three quarter metre of blue cloth to stitch a uniform. Total how much cloth did she purchase?

(1) 5 metre (2) 4.15 metre

(3) 4.95 metre (4) 5.10 metre

**71.** 3000 is divided by which number to get the quotient as 85 and remainder as 25?

(1) 45 (2) 25

(3) 55 (4) 35

**SPACE FOR ROUGH WORK**

**67.** 60 चे 30% = किती?

(1) 9 (2) 90

(3) 30 (4) 18

**68.** गेल्या वर्षी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी इयत्ता पाचवीचे 427523 विद्यार्थी व इयत्ता आठवीचे 238249 विद्यार्थी बसले होते. तर एकूण किती विद्यार्थी परीक्षेला बसले होते?

(1) 662757 (2) 665772

(3) 662752 (4) 667527

**69.** चौकटीत योग्य संख्या लिहा.

$$\left(5+\frac{2}{10}+\frac{4}{100}+\frac{5}{1000}\right) - \left(2+\frac{1}{10}+\frac{3}{100}+\frac{2}{1000}\right) = \boxed{\phantom{000}}$$

(1) 3.003 (2) 3.005

(3) 3.113 (4) 3.004

**70.** रियाने गणवेश शिवण्यासाठी सव्वादोन मीटर पांढरे व पावणेतीन मीटर निळ्या रंगाचे कापड विकत आणले. तर तिने एकूण किती मीटर कापड विकत आणले?

(1) 5 मीटर (2) 4.15 मीटर

(3) 4.95 मीटर (4) 5.10 मीटर

**71.** 3000 या संख्येला कितीने भागले असता भागाकार पंच्याऐंशी व बाकी पंचवीस उरेल?

(1) 45 (2) 25

(3) 55 (4) 35

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

**72.** Suhas participated in a motorbike ride competition of 60 km. He covered the distance with the speed 15 km/hr. If he started at 10:15 am. then at what time will he reach the destination.

(1) 14:15 (2) 12:15

(3) 14:30 (4) 13:00

**73.** Solve

70602 + ☐ = 92328

(1) 22823 (2) 21726

(3) 21720 (4) 27612

**74.** 12 dozen notebooks are packed in one bundle. If the thickness of each notebook is 5 mm then what is the height of the bundle in cm?

(1) 72 cm (2) 720 mm

(3) 720 deci metre (4) 720 m

**75.** Convert the improper fraction $\frac{47}{3}$ into mixed fraction.

(1) $15\ \frac{4}{3}$ (2) $3\ \frac{2}{15}$

(3) $15\ \frac{3}{2}$ (4) $15\ \frac{2}{3}$

**SPACE FOR ROUGH WORK**

**72.** सुहासने 60 किमी अंतर पूर्ण करण्याच्या मोटारसायकलच्या स्पर्धेत भाग घेतला. त्याने ते अंतर 15 किमी ताशी वेगाने पूर्ण केले. जर त्याने ती स्पर्धा सकाळी 10.15 वाजता सुरू केली तर तो निश्चित ठिकाणी किती वाजता पोहचला असेल?

(1) 14:15 वाजता
(2) 12:15 वाजता
(3) 14:30 वाजता
(4) 13:00 वाजता

**73.** 70602 + ☐ = 92328 असल्यास, चौकटीत कोणती संख्या येईल?

(1) 22823
(2) 21726
(3) 21720
(4) 27612

**74.** 12 डझन वह्यांचा एक गठ्ठा बांधला. एका वहीची जाडी 5 मिमी आहे, तर वह्यांच्या गठ्ठ्यांची उंची किती सेमी असेल?

(1) 72 सेमी
(2) 720 मिमी
(3) 720 डेसिमी
(4) 720 मी

**75.** $\frac{47}{3}$ या अपूर्णांकाचे पुर्णांकयुक्त अपूर्णांकात रूपांतर करा.

(1) $15\ \frac{4}{3}$
(2) $3\ \frac{2}{15}$
(3) $15\ \frac{3}{2}$
(4) $15\ \frac{2}{3}$

<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>

कच्च्या कामासाठी फक्त